**-: प्रेस नोट :-**

कक्ष-१०, गु.प्र.शा., गु.अ.वि., मरोळ, मुंबई — दिनांक: १९/१०/२०२१

**'' कोल्हापुर येथील साखर व्यापाऱ्यास हनी ट्रॅप मध्ये अडकवून रू ३ करोड २६ लाखाची खंडणी उकळणाऱ्या गुन्हेगारांना, कक्ष-१० गुन्हे शाखेने केले जेरबंद''**

कोल्हापुर येथील सारखेचे व्यापारी हे व्यवसाया निमीत्त सन २०१६ मध्ये गोवा येथे गेले असता यातील आरोपीताने व्यापाऱ्यांशी ओळख वाढवून मैत्री प्रस्थापित केली व त्यानंतर वारंवारं व्यापारी व अटक आरोपी हे एकमेकाच्या संपर्कात येऊ लागले. सन २०१९ मध्ये कोल्हापुरचे व्यापारी व्यवसायानिमीत्त अंधेरी मुंबई मधील पंचतारांकीत हॉटेल मध्ये, थांबले असताना यातील महिला आरोपीतांने तीची मैत्रीण म्हणुन पाहिजे आरोपीची एकत्र जेवण करण्याच्या बहाण्याने ओळख करून दिली.सदरचे जेवण हे रुम मध्ये मागविण्यात आले होते एक स्त्री आरोपी काही कागदपत्रे तिच्या ओळखीच्या इसमास दयावयाचे असे सांगुन कागदपत्रे न घेताच रुम च्या बाहेर लॉबी मध्ये गेली व दुसरी स्त्री आरोपी वॉश रूम मध्ये गेली थोडया वेळाने बाहेर गेलेली महिला आरोपी डोअर बेल वाजवली असता व्यापारी यांने दरवाजा उघडला असता थोडा वेळ दरवाजात त्यास बोलत उभे केले दुसरी महिला आरोपीने तीचे अंगावरील कपडे काढून ब्लॅकेट गुंडाळून बसली त्यावेळी पाहिली महिला आरोपी जोरजोरात ओरडू लागली आणि मोबाईल मध्ये व्हिडीओ काढून ते समाजमाध्यमावर प्रसारीत करण्याची धमकी देवून त्यांची प्रतिष्ठा मलिन करण्याची धमकी देवून थोडे थोडे करून त्यांचेकडून सन मार्च २०१९ ते आजपर्यत रूपये ३ करोड २६ लाखांची खंडणी घेतली व आणखीन रक्कमेच्या खंडणीची मागणी करु लागले.

सदर प्रकार कोल्हापुरचे व्यापाऱ्यास असहय्य झाल्याने त्यांनी मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), बृहन्मुंबई यांना लेखी तक्रार अर्जान्वये कळविले वरून मा. वरिष्ठांनी नमुद तक्रार अर्जाची चौकशी कक्ष -१०, गुप्रशा,गुअवि, मुंबई यांना देण्यात आली.सविस्तर चौकशी करून गु.प्र.शा, गु.अ.वि, गु.र.क्र. ८७/२०२१ कलम १७०,३४२,३६४(अ), ३८४,३८५,३८८,३८९, ३९२,१२०(ब), भादवि. (सहार पो.ठाणे गुरक्र. ४६७/२०२१) अन्वये गुन्हा नोंद करून तपासावर घेण्यात आला.

दिनांक १८/११/२०२१ रोजी यातील आरोपीतांनी कोल्हापुरचे व्यापारी यांना पुन्हा १७ लाखाची खंडणी मागीतली व सदरची रक्कम घेवून कॅफे कॉफी डे, अंधेरी पश्चिम, मुंबई या ठिकाणी बोलावले असता कक्ष -१०, गुप्रशा, गुअवि, मुंबई च्या पथकाने सापळा रचुन खालील नमुद आरोपीतांना अटक केली आहे. त्या मा. न्यायालयात रिमांडकामी हजर केले असता दि. २५/११/२१ रोजी पर्यत पोलीस कोठडी रिमांड मंजुर करण्यात आली आहे.

**अटक आरोपीताचा तपशिल :-**

१) एक पुरुष वय ४२ वर्षे, रा.ठि - ओबेरॉय स्प्रिंग, सिटी मॉल समोर, अंधेरी पश्चिम, मुंबई.
२) एक पुरुष, वय ४१ वर्षे, रा.ठि - न्यु म्हाडा, लोखंडवाला, अंधेरी पश्चिम, मुंबई.
३) एक स्त्री, वय ४७ वर्षे, रा.ठि -रॉयल एम्पायर, लोखंडवाला सर्कलजवळ, बेवर्ली हिल रोड, अंधेरी प, मुंबई

**पाहिजे आरोपी**

१) एक स्त्री, वय ३० वर्षे, रा.ठि - संगम बिल्डींग, इन्फीटी मॉलच्या बाजुला, अंधेरी प,मुंबई.

**नमुद अटक आरोपीतांच्या घरझडती पंचनाम्यामध्ये खालील चिज वस्तु व रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे.**

| | |
|---|---|
| **१) रोख रक्कम** | **- २९ लाख रूपये.** |
| **२) सोने, हिऱ्याचे दागीने** | **- किं.अं. ८ लाख १५ हजार रूपये** |
| **३) ०७ मोबाईल फोन** | **- किं.अं. २,२०,०००/-** |
| **४) एक आय.व्ही.टेक होंडा मो/कार** | **- किं.अं. ५,००,०००/-** |
| **५) एक व्होल्सवॅगन वेंटो मो/कार** | **- किं. अं. ५,००,०००/-** |
| **एकुण जप्त मालमत्ता कि.अं** | **- ४९,३५,०००/-** |

यातील अटक आरोपीतांनी अशा प्रकारचे गुन्हे केले असल्याची दाट शक्यता असल्याने अशा प्रकारचे कृत्य कोणाबरोबर झाले/होत असल्यास कक्ष -१०, गुप्रशा, गुअवि, मुंबई येथे संपर्क करावा.

सदरची यशस्वी कारवाई मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. मिलिंद भारंबे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. एस. विरेश प्रभू, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१) गुन्हे शाखा, श्री. नीलोत्पल, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-पश्चिम.अति.कार्य.) गुन्हे शाखा श्री. अलकनुरे यांचे मार्गदर्शनाखाली, कक्ष-१० गुप्रशा, मरोळ मुंबई येथील **प्रभारी पोलीस निरीक्षक श्री महेशकुमार ठाकुर,** पोलीस निरिक्षक श्री किरण लोंढे, पालीस निरिक्षक श्री उत्तम भजनावळे, सहाय्यक पालीस निरिक्षक श्री. गणेश तोडकर, श्री. विजय सांडभोर, श्री वाल्मिक कोरे, श्री. अफरोज शेख, सफौ. रविंद्र माने, पोलीस अंमलदार अहमद शेख, सुनिल शेटे, दिलीप माने,संतोष धनवडे, रामकिशन मोरे, रमेश नलावडे, मधुसूदन चवरे, संतोष वंजारी, अमित जगताप, अविनाश चिकणे, संतोष जावळी, दिग्विजय पानसरे, सचिन ठोंबरे, चंद्रशेखर डफळे, स्वाप्निल खेडेकर, महिला अंमलदार सुमन चौगुले, स्वाती सोनावणे, दया खाडे, प्रकाश चव्हाण यांनी पार पाडली आहे.

**** D1/88/2021****

Scanned with CamScanner